## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ ऑगस्ट २०१०

### अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक मत्स्यआ २००८/प्र.क्र. १६५/पदुम-१२.— भारताचे संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून आणि यापुर्वी यासंबंधीत अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा विलेख अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील महाराष्ट्र मत्स्यव्यवसाय सेवा गट-अ मधील सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (भूजल/सागरी/निपास) (तांत्रिक) या पदाच्या सेवा भरतीचे विनियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (भूजल/सागरी/निपास) (तांत्रिक), गट-अ (सेवाप्रवेश) नियम, २०१० असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(अ) " आयोग " म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग ;

(ब) " आयुक्तालय " म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील आयुक्त, मत्स्यव्यवसाय कार्यालय ;

(क) " विभाग " म्हणजे कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग ;

(ड) " शासन " म्हणजे महाराष्ट्र शासन ;

(इ) " सहआयुक्त मत्स्यव्यवसाय " यामध्ये आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्या अखत्यारितील गट-अ मधील सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (भूजल), सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (सागरी) सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (निपास) यांचा समावेश होतो.

३. आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयातील सहआयुक्त, मत्स्यव्यवसाय (भूजल/सागरी/निपास) (तांत्रिक), गट-अ या पदावरील नेमणुका,—

मत्स्य सेवा गट-अ (तांत्रिक) या संवर्गातील प्रादेशिक उप आयुक्त मत्स्य/उपआयुक्त(अर्थ व

CamScanner

नियोजन) या संवर्गात किमान तीन वर्षे नियमित सेवा पूर्ण केलेल्या सुयोग्य व्यक्तींचा जेष्ठताधीन निव्वळ गुणवत्ता या निकषावर पदोन्नतीने करण्यात यावी.

४. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त व्यक्ती यासंबंधात तयार केलेल्या नियमानुसार मराठी व हिंदी याची परीक्षा यापूर्वी उत्तीर्ण केलेली नसल्यास वा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास सदर परीक्षा पूर्ण होणे आवश्यक राहील.

५. नियम ३ मध्ये नमूद पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणी संबंधीचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश अग्रवाल,
शासनाचे सचिव (पदुम).

CamScanner